भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. ७०० / माहिती कक्ष / वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १०/१०/२०१७

**१) संगनमत करून विवाहितेला हुंडयासाठी शारीरीक व मानसीक त्रास दिल्याने, त्रासाला कंटाळुन विष प्राशन करून आत्महत्या केल्याने गुन्हा नोंद:—**

दिनांक ०९/०९/२०१७ चे ०५.१५ वाजता दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करून आरोपी क्र. ०१ याचे फिर्यादीची बहिन मृतक हिचे सोबत लग्न झाले असुन, आरोपींनी ३, ४ वर्षा नंतर हुंडयासाठी शारीरीक व मानसीक त्रास देत होते, फिर्यादीची बहिन मृतक हिने त्यांचे त्रासाला कंटाळुन दि. ०९/०९/२०१७ ला कोणतेतरी विष प्राशन करून आत्महत्या केली आहे. असे फिर्यादीने दि. ९/१०/२०१७ ला पो.स्टे ला लेखी तक्रार दिल्याने पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४९८(अ)३०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. वर्मा पो.स्टे साकोली हे करीत आहेत.

**२) अल्पवयीन मुलीला फुस लावुन पळवुन नेल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०८/१०/२०१७ चे २३.३०ते दि. ०९/१०/२०१७ चे ०४.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हे रात्री आपले परीवारासह आपले घरी झोपले असतांना, कोणीतरी अरोपीने फिर्यादीची अल्पवयीन मुलगी हिला फुस लावुन पळवुन नेल्याने, फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३६३ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. आतराम पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**३) ट्रकच्या धडकेत दोन जखमी :—**

दिनांक ०९/१०/२०१७ चे ०८.१५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकांनी आपआपले ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन एकमेकाच्या ट्रकला ड्रायव्हर साईडने एकमेकास धडक दिल्याने व दोन्ही चालाकंनी एकमेकास दुखापत करण्यास कारणीभुत झाल्याने, सरतर्फे फिर्यादी सफौ. मुटकुरे यांचे चौकशी अहवाल व मेडीकल रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७ भांदवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनघटे पो.स्टे कारधा हे करीत आहेत.

**४) ईलेक्ट्रीक करंट लागुन इसमाचा मृत्यु. :—**

दिनांक ०९/१०/२०१७ चे १०.२५ वाजता दरम्यान यातील मृतक तुकाराम तिमा तिघरे वय ६५ वर्ष, रा. वलनी हा घरी हजर असतांना टिव्ही पाहण्यासाठी ईलेक्ट्रीक बोर्डाची स्वीच सुरू करण्याकतीता गेला असता, मृतक याला ईलेक्ट्रीक करंट लागल्याने मृतक हा जमीनीवर खाली बेशुध्द अवस्थेत पडला असतांनी, व कोणतेही बोलचाल करीत नसतांना फिर्यादी यास मिळुन आल्याने त्याचा उपचारा करीता ग्रा.रू पवनी येथे भरती केले असता डॉ. आशीष मोहनकर यांनी मृतक यास तपासुन मृत घोषीत केल्याने, फिर्यादी रामचद्र तुकाराम तिघरे वय ३४ वर्ष रा. वलणी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पो.ना. चुटे पो.स्टे पवनी हे करीत आहेत.

**५) अचानक प्रकुती बिघडल्याने इसमाचा मृत्यु:—**

दिनांक ०९/१०/२०१७ चे १०.३० वाजता दरम्यान यातील मृतक रमेश केशव चुटे ४७ वर्ष, रा.मेंढा भुगाव याची प्रकृती अचानक बिघडल्याने त्यास उपचारा करीता दवाखान्यात नेण्याची तंयारी करीत असतांना, मरण पावल्याने, फिर्यादी लिलाधर केशव चुटे वय ४४ वर्ष, रा.मेंढा भुगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोले पो.स्टे पालांदुर हे करीत आहेत.

६) औषधोपचारा दरम्यान महिलेचा मृत्युः—

दिनांक ०९/१०/२०१७ चे ०९.३० वाजता दरम्यान यातील मृतक शांताबाई कुसन मेश्राम ६० वर्ष, रा. सिरसघाट ही दि. ०९/०९/२०१७ चे ०७.०० वाजता दरम्यान औषधोपचारा करीता सा.रू.भंडारा येथे उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरून व सरतर्फे फिर्यादी पोना. पुराम यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. लांडे पो.स्टे कारधा हे करीत आहेत.

७) अवैध दारू अंडयावर धाडी . :—

दिनांक ०९/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, कारधा, तुमसर, आंधळगाव व पवनी येथे अवैध दारू अंडयावर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून ३३ लिटर हातभट्टी किंमती २,८००/—रु, व १८ लिटर ७२० मिलीलीटर विदेशी / देशी दारू+ मोटार सायकल कि. ५५,३१६/रु असा एकुण ५८,११६/—रु. चा माल जप्त करण्यात आला.

८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक ९/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ८९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०३ तीन सिटर वाहनांवरती ०७ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ७९ केसेस करण्यात आले आहे.

10.10

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता